## प्रेसनोट दि १३/०६/२०१८.

रॉयल ट्विंकल स्टार क्लब लिमि. व सिट्रस चेक इन्स लिमि.,वडाळा मुंबई या कंपनीचे फसवणूक प्रकरणातील कंपनीचे मुख्य संचालक आरोपी ओमप्रकाश बसंतलाल गोएंका यास आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर येथील पथकाने जेरबंद केलेबाबत

स्वारगेट पो.ठा.,पुणे शहर, गु.र.नं.४१६/१७ भा.दं.वि.कलम ४०६,४०९,४२०, १२०(ब), सह महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थांमधील) हित संबंधाचे संरक्षण अधिनियम सन १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे फिर्यादी श्री. धनंजय विश्वनाथ पटवर्धन वय ७४ वर्ष,रा. ब्लॉक नं. ०३ वासवी,अपार्टमेंट,२१०१ सदाशिव पेठ पुणे ३० यांनी रॉयल ट्विंकल स्टार क्लब लिमि. व सिट्रस चेक इन्स लिमि. या कपंनीचे संचालक आरोपी नामे **१) ओमप्रकाश वसंतलाल गोएंका, संचालक, वय – ६८ वर्षे , रा. रा.१०१ ,१०वा मजला, सोमर्ससेठ हाऊस सोफीया कॉलेज लेन वॉर्डन रोड, मुंबई २६ यास दि.१२/०६/२०१८ रोजी वेळ १८.३० वा. अटक करण्यात आली आहे.** २) प्रकाश गणपत उत्तेकर, संचालक, रा. ३०१, तेजस हाईटस, प्लॉट नं. २४५, सायन हॉस्पिटल समोर सायन पुर्व मुंबई. ३) नटराजन व्यंकटरामन (अय्यर) उर्फ व्हि.नटराजन, संचालक , रा.रा. १००१/२ माऊन्ट एव्हरेस्ट ए विंग भक्ती पार्क आयनॉक्स सिनेमाजवळ , वडाळा मुंबई, ४) एल.एस.कोटणीस, संचालक, रा. ३०१, तेजस हाईट्स , प्लॉट नं. २४५, सायन हॉस्पिटल समोर, सायन पुर्व मुंबई यांच्याविरुध्द दि. १८/१२/२०१७ रोजी१९,२४,७००/-रु. आर्थिक फसवणूक केलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर येथे सुरु आहे.

सदर गुन्ह्याचे तपासादम्यान आत्तापर्यंत एकूण ३१३५ एवढ्या गुंतवणूकदारांनी तक्रारी नोंदविलेल्या असून आत्तापर्यंत एकूण फसवणूक रक्कम ४१,०३,२०,९६८/- रु. एवढी वाढलेली आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी यांच्याविरुध्द लासलगाव पो.ठा.नाशिक ग्रामीण, गु.र.नं.३२/२०१८, व आर्थिक गुन्हे शाखा, कक्ष-७, मुंबई यांचेकडील गु.र.नं. १४/२०१८ तसेच नगर येथेही गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी व कंपनीचे संस्थापकीय चेअरमन ओमप्रकाश बसंतलाल गोएंका यांना दि.१२/०६/२०१८ रोजी नाशिक कारागृह , जिल्हा नाशिक येथून सदर आरोपीस दि.१२/०६/२०१८ रोजी सदर गुन्ह्याचे तपासकामी अटक करून त्यास दि.१३/०६/२०१८ रोजी मा. विशेष जिल्हा सत्र न्यायाधीश , जिल्हा न्यायालय,शिवाजीनगर,पुणे यांच्या न्यायालयात हजर केले असता दि.१९/०६/२०१८ रोजीपावेतो मा.न्यायालयाने सदर आरोपीस पोलीस कोठडी रिमांड दिलेली आहे.

तसेच रॉयल ट्विंकल स्टार क्लब लिमि. व सिट्रस चेक इन्स लिमि.मुंबई या कपंनीमध्ये पुणे शहरामधील गुंतवणूक केलेल्या व फसवणूक झालेल्या नागरीकांनी **आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर संगमब्रीज शिवाजीनगर येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय कुरुंदकर यांचेशी संपर्क साधावा.**